## वाय.सी.मध्ये सेंटर फॉर, इन्व्हेंशन, इनोव्हेशन व इनक्युबेशन व गोल्डन ज्युबिली इमारतीचे उद्‌घाटन संपन्न

**सातारा :-** (प्रतिनिधी) महाराष्ट्रातील सर्वसामान्य व गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले तर तो स्वत:बरोबरच समाजाचा आणि राष्ट्राचा विकास करु शकतो. हा विचार करुन पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीर आण्णांच्या दूरदृष्टीनुसार शैक्षणिक विस्ताराचा आणि गुणात्मक शिक्षणाचा विचार करुन रयत शिक्षण संस्था गेली ९९ वर्षे महाराष्ट्रातील १५ व कर्नाटक राज्यातील एका जिल्ह्यात शैक्षणिक कार्याची वाटचाल मोठ्या दिमाखाने करीत आहे. संस्थेचा गुणवत्ता पूर्ण शिक्षणाचा आलेख सातत्याने उंचावत राहिलेला आहे. गेली ९९ वर्षे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांच्या पूर्ततेसाठी संस्था अग्रेसर राहिली आहे.

त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना उद्धोगनिर्मिती क्षमतेबरोबरच कल्पना शक्ति व संशोधन क्षमतेला चालना मिळावी म्हणून रयत शिक्षण संस्था, सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरची उभारणी करीत आहे.

आज ४ ऑक्टोबर २०१८ रोजी या शताब्दी वर्ष पदार्पणाच्या निमित्ताने टाटा टेक्नॉलॉजी, सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क पुणे व रयत शिक्षण संस्था यांच्या संयुक्तविद्यमाने, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या महाविद्यालयात CIII सेंटरचे उद्‌घाटन मानव संसाधन विकास मंत्री, भारत सरकार नवी दिल्ली, मा.प्रकाश जावडेकर व रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. खासदार शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते झ ाले. याचवेळी महाविद्यालयातील गोल्डन ज्युबिली इमारतीचे उद्‌घाटन व पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी चव्हाण यांच्या तैलचित्राचे मान्यवरांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. .उद्‌घाटन सोहळयानंतर सहभागी चित्ररथांना महाविद्यालयाच्या प्रांगणात मान्यवरांनी भेट दिली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.जी.कानडे यांनी केले.

या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील,सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील ,मा.आ.दिलीप वळसे पाटील,मा.आ.शशिकांत शिंदे,मा.आ.विश्वजीत कदम, टाटा टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष मा.आनंद भदे, सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे चे अध्यक्ष मा.दिलीप बंड, महासंचालक डॉ.राजेंद्र जगदाळे, श्रीधर करंदिकर सचिव मा.प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे, सहसचिव प्राचार्य डॉ.विजयसिंह सावंत, ऑडिटर डॉ.अरुण आंधळे, टाटा टेक्नॉलॉजीचे विनय रावत, अपूर्वा हरेल, सिध्दार्थ काळे,रविकीरण कुलकर्णी व विनायक गुपचुप,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.जी.कानडे तसेच रयत शिक्षण संस्थेतील सर्व पदाधिकारी,संस्थेच्या विविध शाखांचे मुख्याध्यापक व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सकाळी सातारा शहरामधून आयोजित करण्यात आलेल्या प्रभात फेरीमध्ये संस्थेच्या विविध विभागामधून आलेल्या चित्ररथांनी सहभाग घेतला. त्यामध्ये क्रिडा अॅकडमी रायगड विभाग, वुमेन्स मिलिटरी अॅकडमी एस.जी.एम. कॉलेज कराड, उपेक्षितांच्या शिक्षणासाठी - चित्ररथ मध्य

विभाग, रयत सायन्स ॲन्ड इनोव्हेशन, ॲक्टिव्हिटी सेंटर वर्ये, पश्चिम विभाग औंध पुणे, उत्तर विभाग अहमदनगर, दक्षिण विभाग, सांगली, वाय.सी.इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, तसेच आण्णासाहेब कल्याणी विद्यालय व महाराजा सयाजीराव विद्यालय, सातारा,छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा यांचे चित्ररथ सहभागी झाले होते. त्याचबरोबर राज्य व राष्ट्रीय स्तरावरती रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निवड झालेल्या बहुद्देशीय कृषी अवजारे यांचीही प्रदर्शने याठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

---

जा.क्र. 1204 /२०१८-१९ .    दि. ०४ /१० /२०१८

प्रती,<br>
मा. संपादक,<br>
दैनिक<br>
सातारा

महोदय,

सदरची बातमी आपल्या सुप्रसिध्द दैनिकात प्रसिध्द करणेविषयी विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य<br>
यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स,<br>
सातारा


Yashavantrao Chavan Institute of Science, Sata
CIII - Centre for Invention, Innovation and Incubation
TATA Technologies, Science & Technology Park, Pune
and
Rayat Shikshan Sanstha, Satara
Joint Collaboration
INAUGURATION CEREMONY
Thursday 4th October, 2018
At the auspicious hands of
Hon. Shri. Prakash Javadekar
Human Resource Development Minister, Govt. of India
Guest of Honour
Hon. Shri. Sharad Pawar
President, Rayat Shikshan Sanstha, Satara
In gracious presence of
Dr. K. D. Kanade
Building Committee
Faculty &
Staff Members